(१४५) 9 08 2020

## घटक - ४ - विजयनगर व बहमनी राज्ये (साम्राज्य)

**पार्श्वभूमी :-**

महंमद तुघलकांच्या कारकीर्दीपासूनच त्यांच्या लहरी धोरणामुळे तुघलक साम्राज्याची विघटनाकडे वाटचाल चालली होती. त्यांच्या साम्राज्यातून फुटून उत्तर व दक्षिण भारतात अनेक नवीन राज्ये उदयास आली. उत्तर भारतात माळवा, जौनपूर, गुजराथ, बंगाल, आसाम, ओरिसा, काश्मिर, मारवाड व मेवाड ही राज्य स्वतंत्र झाली. तर दक्षिण भारतात विजयनगर, बहामनी व खानदेश ही स्वतंत्र राज्य उदयास आली. विजयनगर व बहमनी राज्यांनी मध्ययुगीन भारताच्या इतिहासात राजकीय व सांस्कृतिक दृष्टया फार मोठी कामगिरी केली. राक्षस-तागडीच्या (१५६५) लढाईने विजयनगरचे साम्राज्य नष्ट झाले तर बहामनी साम्राज्याच्या शाखा दक्षिणेत अनेक शतके राज्य करत होत्या.

### (अ) विजयनगर साम्राज्याचा उदय : हरिहर, बुक्का, कृष्णदेवराय :

**विजयनगर साम्राज्याची स्थापना (इ.स १३३६)**

तुघलकांच्या साम्राज्याच्या विघटनातून दक्षिणेत बहमनी व विजयनगर साम्राज्यांचा उदय झाला होता. विजयनगर साम्राज्याची सर्व माहिती आपल्याला फेरिस्ताच्या लिखाणावरून व रॉबर्ट सिवेलच्या 'फॉरगॉटन एम्पायर' या ग्रंथावरून होते. इ.स १२९८ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेत प्रवेश करून देवगिरीच्या यादवावर स्वारी केली. १३१८ मध्ये मुबारक या

अल्लाउद्दीनच्या पुत्राने यादवांचे राज्य जिंकून घेतले
अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफूरने
दक्षिणेतील राज्यावर स्वारी करून त्यांना आपल्या अधिन
बनविले. केरळ राज्य सोडून यादव काकतीय, पांड्य
व होयसळ नरेशांनी मुस्लिम सत्तेची अधिसत्ता मान्य
केली. दक्षिणेतील ही राज्य दिल्लीपासून दूर असल्या-
-मुळे सुलतानाने येथील प्रदेशाची सत्ता आपला
प्रतिनिधी म्हणून सुभेदाराकडे सोपविली. हे सुभेदार
वार्षिक कर व सैनिकी मदत सुलतानास करीत
असत. सुभेदार आपल्या मनमानी कारभारामुळे
दक्षिणेत लोकप्रिय होऊ शकले नाहीत. महंमद
तुघलकांच्या कारकीर्दीच्या शेवटच्या काळात
साम्राज्यात अराजकता निर्माण झाली. ~~याचाच~~
याचाच फायदा घेऊन १३३५ मध्ये जलालुद्दीन
अहसानशाहने बंड करून मदुरा येथे स्वतंत्र राज्या-
-ची स्थापना केली. याचे अनुकरण करून, दक्षिणेत यादववंशीय
संगमच्या पुत्रांनी इ.स. १३३६ मध्ये विजयनगर
साम्राज्याची स्थापना ~~केली. हरिहर आणि~~
~~बुक्का या बंधूंनी केली. त्यापूर्वी~~

— हरिहर कंपा प्रथम, बुक्का प्रथम, मारप्पा,
या परिवारातील दोन बंधू हरिहर व बुक्का
~~या दोन~~ यांनी केली.

(१४३) Date 02 06 2020

उत्तरकालीन राजांच्या शिलालेखानुसार यादव वंशातील चंद्रवंशीय संगमचे ते मुले होती म्हणून त्यांना संगम वंश असेही म्हणतात.

(*) विजयनगर साम्राज्याचे संस्थापक - हरिहर आणि बुक्का :-
हरिहर व बुक्का हे दोन बंधू वरंगळच्या राजा प्रतापरुद्रदेवाच्या पदरी सेवेस होते. परंतु इ.स. १३२३ मध्ये वरंगळ मलिक काफूरने जिंकल्यानंतर हे दोन बंधू रायचूर प्रदेशातील अनागोंदी या तुंगभद्रेच्या तीरावर वसलेल्या गावी येऊन राहिले. इ.स. १३३४ मध्ये महंमद तुघलकाने अनागोंदी शहर जिंकले व हरिहर व बुक्क यांना पकडून दिल्लीस नेले, व त्यांना मुस्लिम बनविले. रायचूर मध्ये सुलतानास शांतता व सुव्यवस्था निर्माण करता आली नाही. त्यामुळे तघलक सुलतानाने हरिहर व बुक्का यांना आपला प्रतिनिधी म्हणून पाठविले. या दोघांनी दक्षिणेत आल्यानंतर इस्लाम धर्माला त्याग केला. आणि शृंगेरीतील विद्यारण्य स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा हिंदुधर्मात धर्मांतर केले आणि तुंगभद्रा नदीच्या तीरावर विजयनगरची स्थापना प्रसिद्ध हिंदु संत विद्यारण्य स्वामींच्या मदतीने केली इ.स. १३३६ मध्ये विजयनगर येथे हिंदु साम्राज्य स्थापन केले.

या विजयनगरच्या हिंदु साम्राज्यात इ.स. १३३६ ते १५६५ या काळात तीन राजवंशांनी राज्य केले.

(१) संगम वंश (१३३६ - १४८५)

(२) सालुव वंश (१४८५ - १५०६)

(३) तुळुव वंश - (१५०५ - १५६५)

What makes you happy?
#HappyCollegeDays
#
#

Scanned with CamScanner

शनिवार
Date ०२ ०६ २०२०

## संगमवंश (इ.स. १३३६-१४८५) :-

① **हरिहर (१३३६-१३५३)** :- विजयनगर या नवीन राज्याचा पहिला राजा 'हरिहर' झाला. हरिहर व बुक्क यांच्या वडिलांचे नाव संगम होते. त्यामुळे त्यांचा वंश संगमवंश या नावाने इतिहासात ओळखला जातो. हरिहर या कर्तबगार राजाने आपल्या राज्याचा विस्तार फार मोठ्या प्रमाणात केला.

१३४० पर्यंत त्याने कोकणाचा काही प्रदेश, मालाबार किनारा, आणि तुंगभद्रेचे खोरे ताब्यात घेतले होते. दक्षिणभारतातून मुसलमानी सत्ता नष्ट करण्यासाठी १३४४ मध्ये वरंगळच्या नरेश कृष्णनायक याने जो संघ तयार केला होता त्या संघात हरिहरने सहभाग घेतला. होयसळ राजा विरुपाक्ष बल्लाळ मदुराच्या सुलतानाशी लढता लढता १३४६ मध्ये ठार झाला. त्यानंतर होयसळचा सर्व प्रदेश हरिहरने जिंकून घेतला. त्याच्या साम्राज्याचा विस्तार उत्तरेस कृष्णा नदीपासून दक्षिणेस कावेरीनदीपर्यंत, तर पूर्वेस समुद्र ते पश्चिमेस समुद्रापर्यंत केला होता. त्याने विजयनगरच्या ठिकाणी एक मोठा दुर्ग तयार केला. साम्राज्य-विस्ताराचे समान ध्येय असल्यामुळे विजयनगर आणि बहामनी राज्य यांच्यात सतत युद्ध होत राहिली. या दोन्ही राज्यात कायमची विकुष्टता निर्माण झाली. त्यामुळेच कालांतराने विजयनगर राज्याचा अंत झाला.

What makes you ...
#HappyCollegeDays

Scanned with CamScanner

सोमवार

(५५) Date 03 05 2020

हरिहर हा एक कुशल प्रशासक होता. त्याने प्रांतात विभाजन करून त्याचे शासन कुशल व्यक्तीकडे सोपविले. तो १३५६ मध्ये मृत्यू पावला. प्राप्त झालेल्या शिलालेखात तो पराक्रमी नसेल पूर्व, पश्चिम व दक्षिण सागराचा स्वामी असल्याचा उल्लेख आढळतो. त्याने चीनी सम्राटाकडे आपला दूत पाठवून त्याच्याशी मैत्री केली. बहमनी सुलतान मुहम्मदशाह व मुजाहिदशाह यांच्याबरोबर अनेक युद्धे करून याने तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील बराचसा प्रदेश जिंकून घेतला.

२. बुक्क (१३५६ ते १३७७) :- ~~हरिहर द्वितीयनंतर त्याला~~ पुत्र हरिहरच्या मृत्यूनंतर त्याचा बंधू बुक्क हे विजयनगरचे राजा बनले. बुक्क हे हरिहर प्रमाणेच पराक्रमी सेनापती व कुशल प्रशासक होते. तो एक उदार धर्मप्रवण व धर्मसहिष्णु शासक होता. त्याने जैन व वैष्णव यांच्यात चाललेला संघर्ष मिटविला. त्याने बहमनी सुलतान मुहम्मद शाहर मुजाहिद शाह यांचा पराभव केला. अभिलेखावरून स्पष्ट होते की बुक्क हा तिन समुद्राचा (सागराचे) अधिपती होतो. त्याने चीनी सम्राट ताई-त्सुच्या दरबारात आपला दूत पाठवून त्याच्याशी मैत्री केली. इ.स. १३७७ मध्ये मृत्यू पावला.

बुक्काच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र हरिहर द्वितीय हा गादीवर आला त्याने स्वतःस 'महाराजाधिराज' ही पदवी धारण केली. हरिहर द्वितीयाच्या समकालीन बहमनी सुलतान मुहम्मदशहा द्वितीय हे शांतिप्रिय शासक होते तसेच हरिहर द्वितिय सुद्धा शांतिप्रेमी व धर्मसहिष्णु शासक होता.

Scanned with CamScanner

या काळात शत्रूशी अधिक युद्धे न करता आपल्या राज्याला आर्थिक सुदृढ केले. त्याचा सेनापती गंडयाने केरळ. आंध्र कटक व तेलप ही राज्ये जिंकून घेतली त्याने लोककल्याणाकडे लक्ष दिले. त्याने अनेक मंदिरे बांधली १४०४ मध्ये त्याचा मृत्यू झाला त्यानंतर त्याचा पुत्र देवराय या सत्तेवर आला देवराय १४१० मध्ये मरण पावला त्यानंतर विजयराय (१४१०-१४१९) सत्तेवर आला या काळात कोणतीही महत्वपूर्ण घटना घडली नाही. त्यानंतर देवराय द्वितीय (१४१९-१४४५) हा विजयरायाच्या मृत्युनंतर सत्तेवर आला त्याची कारकिर्द बहामनी राज्याशी संघर्ष करण्यात गेली. देवरायाच्या कारकिर्दीत इटालीयन प्रवासी निकोलोकोंटी व इराणच्या राजदूत अब्दुर्रज्जाक यांनी विजयनगरास भेट दिली होती

१४४५ मध्ये देवराय याचा मृत्यू झाल्यानंतर मल्लिकार्जुन व विरूपाक्ष या त्याच्या दोन मुलांनी काही काळ सत्ता उपभोगली. हे दोघेही अत्यंत दुर्बल व अयोग्य होते. विरूपाक्षच्या काळात राज्यात अनेक बंडांनी थैमान घातले अशाच एका बंडात विरूपाक्ष व त्याची दोन्ही मुले मारली गेली. यानंतर तेलंगणाचा शक्तिशाली सामंत सुलुव नरसिंह ने विजयनगरची सत्ता हस्तगत करून स्वतःस विजयनगरचा शासक म्हणून जाहीर केले.

What makes you happy?
#HappyCollegeDays

Scanned with CamScanner

(७४)

Date ०३ ०६ २०२०

* शाळव वंश (१४९०-१५०५) - तेलंगणाचा सामंत सुळुव नरसिंह याने विरुपाक्ष राजास ठार करून विजयनगर या ठिकाणी १४९० मध्ये शाळव वंशाची स्थापना केली. नरसिंह कर्तबगार व योग्य राजा होता. याच काळात बहामनी राज्याचे विभाजन होऊन अनेक राज्ये निर्माण झाली. त्याचा फायदा घेऊन नरसिंहच्या काळात विजयनगरच्या दरारा निर्माण झाला. त्याने फक्त सहा वर्ष १४९६ पर्यंत राज्य केले. त्यानंतर त्याचा पुत्र इम्मडी नरसिंह सत्तेवर आला तो दुर्बल व अयोग्य निघाल्यामुळे राज्याची सूत्रे त्याचा सेनापती नरेश नायक कडे गेली. त्याच्या मृत्यूनंतर वीरनरसिंह हा सेनापती बनला. त्याने इम्मडी नरसिंह यास पदच्युत करून सत्ता ताब्यात घेतली. अशा प्रकारे १५०५ मध्ये शाळव वंशाची सत्ता संपुष्टात येऊन त्याठिका त्याठिकाणी तुळुव वंशाची सत्ता स्थापन झाली.

* तुळुव वंश (१५०५-१५७०) (१) कृष्णदेवराय (१५०९-१५३०)

नरेश नायकच्या पुत्र वीर नरसिंह याने विजयनगर येथे तुळुव वंशाची सत्ता स्थापन केली. त्याने एकूण चार वर्ष राज्य केले. वीर नरसिंहनंतर त्याचा लहान भाऊ कृष्णदेवराय इ. स १५०९ मध्ये विजयनगरचा राजा झाला. कृष्णदेवराय तुळुववंशातील सर्वश्रेष्ठ व कर्तबगार राजा होता. डॉ ईश्वरीप्रसाद यांच्यामते "कृष्णदेवरायच्या कारकीर्दीपासून विजयनगर राज्याच्या एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. त्यांनी मुसलमान

Date 03 06 2020

सलोशी लढा देऊन राज्याचा विस्तार केला त्यांच्या काळात विजयनगरची भरपूर भरभराट झाली तो गुणी विद्वानांचे चाहता होतो. त्यांच्याकाळातील लोक सुखी व समृद्ध होते. म्हणूनच त्यांच्या काळास सुवर्णयुग म्हटले जाते."

कृष्णदेवराय यांनी आपल्या राज्याच्या विस्ताराचा प्रारंभ म्हैसूरपासून केला. म्हैसूरचे सरदार गंगाराज यांचा पराभव करून त्यांचे प्रदेश विजयनगरच्या राज्याला जोडले १५१३ मध्ये ओरिसाच्या नरेशांचा पराभव केला. ओरिसाच्या नरेशांना कृष्णदेवरायशी आपल्या कन्येचा विवाह करून मैत्रीसंबंध दृढ केले. बहामनी राज्याचे शकले होऊन दक्षिणेत पाच शाह्या निर्माण झाल्या होत्या. त्या परस्परात भांडत होत्या. याचा फायदा घेऊन कृष्णदेवराय यांनी विजापूरच्या सुलतान अली आदिलशहांच्या ताब्यातील रायचूरवर १५२० मध्ये स्वारी केली. आदिलशहाचा रायचूरच्या लढाईत १९ मे १५२० मध्ये कृष्णदेवराय यांनी प्रचंड पराभव केला. विजापूर-ची नासधूस करून अमाप संपत्ती लुटली. हजारो मुस्लिम लोकांना कंठस्नान घालण्यात आले. कृष्णदेवरायच्या या विजयामुळे दक्षिण भारतातील मुसलमान सत्तांच्या उरात धडकीच भरली होती. या युद्धानंतर विजापूरच्या सुलतानांनी कधीही विजयनगरकडे वाकड्या नजरेने पाहिले नाही.

Date 03 06 2020

इतकी दहशत त्यांच्यात निर्माण झाली होती. या विजया-मुळे विजयनगर दक्षिणेत सर्वश्रेष्ठ व शक्तिशाली ठरले. परंतु या विजयामुळेच विजयनगरचे राजे गर्विष्ठ बनले. आपल्या पुढे कोणत्याही मुसलमान सत्तेचा टिकाव लागणार नाही या अभिमानात ते राहिले. त्यामुळे त्यांनी राज्याच्या संरक्षणाकडे लक्ष दिले नाही. परिणामी तालीकोटच्या लढाईत विजय-नगरचा कायमचा पराभव झाला.

कृष्णदेवराय यांच्या काळात समुद्र किनाऱ्याजवळील प्रदेशात पोर्तुगीजांनी वसाहती स्थापन केल्या होत्या. पोर्तुगीज गव्हर्नर अल्बुकर्क यांनी भटकळ येथे किल्ला बांधण्याची परवानगी मागण्यासाठी कृष्णदेवरायकडे एक प्रतिनिधी मंडळ पाठविले होते. पोर्तुगीज व कृष्णदेवराय यांच्यात झालेली मैत्री विशेषतः मुस्लिम सत्ताधिशांना शह देणारी होती. पोर्तुगीजांना मुस्लिम सत्ताधिशां-पासून गोवा जिंकून घेण्यास ~~अनुमती~~ अनुमती कृष्णदेवराय यांनी दिली होती.

कृष्णदेवराय एक योद्धा, कर्तबगार, रूपवान, धार्मिक व धर्मसहिष्णु राजे होते. ते विद्वानांना आश्रयदाते असून त्यांच्या दरबारात आठ विद्वान होते. ते स्वतः विद्वान होते. त्यांनी अनेक मंदिरे व ब्राह्मणांना आर्थिक मदत केली. अनेक लोककल्याणाची कामे केली व अनेक मंदिरे बांधली. पोर्तुगीज प्रवासी डोमिंगोस पाईस यांनी लिहिले की, "कृष्णदेवराय सारखे विद्वान, सर्वगुणसंपन्न राजे मिळणे कठीण आहे. हे एक महान

Scanned with CamScanner

व न्यायप्रिय शासक आहे. ते प्रसन्नचित्त प्रसन्नचित्त, विनोदप्रिय असून विदेशीयांचे मोठ्या खुषीने स्वागत करतात. त्यांच्या शूरतेची तुलना तत्कालीन कोणत्याच राजाशी करता येणार नाही."

डॉ ईश्वरी प्रसादच्या मते, "दक्षिण भारताच्या इतिहासात कृष्णदेवराय यांची बरोबरी करेल असा एकही हिंदू किंवा मुसलमान राजा आला नाही." त्यांनी दक्षिणेत हजारस्वामी व कृष्णस्वामी ही मंदीरे बांधले, आपल्या एका राणीच्या स्मृती प्रित्यर्थ नागलपूर नावाचे उपनगर स्थापन केले. कृष्णस्वामीच्या मंदिराजवळ नृसिंहाचा एक मोठा दगडी पुतळा त्यांनीच तयार केला होता.

सर्व दक्षिण हिंदुस्थान त्याच्या ताब्यात असून दुसरे पुष्कळ राजे त्यास करभार देत असत. त्याच्या कारकिर्दीत राज्याचा मोठा विस्तार झाला. प्रसिद्ध विद्वान अप्पय्या दीक्षित कृष्णदेवरायाच्या पदरी होता. हंपी येथे देवालयासमोर त्याने बांधलेले दोन मनोरे आहेत. त्याने प्रजेच्या कल्याणासाठी मोठे प्रयत्न केले. त्यामुळे तो प्रजेला आवडता राजा होता. तो स्वत: वैष्णव होता. प्रजेला मात्र धार्मिक पूजेचे स्वातंत्र्य दिलेले होते. त्याने संस्कृत व तेलगू वाङ्मयाला उत्तेजन दिले. त्याने तेलगूमधून 'आमुक्तमाल्यदा' हा ग्रंथ

Date ०३ ०६ २०२०

लिहिला आणि संस्कृत मधून फार पुस्तके लिहिली. कालवे काढून व तलाव बांधून पाण्याची व शेतीची सोय केली. त्याच्या मृत्युनंतर मात्र साम्राज्याला उतरती कळा लागली.

(२) अच्युतराव (१५३०-१५४२) - कृष्णदेवरायाच्या मृत्युनंतर त्याचा भाऊ अच्युतराव गादिवर बसला. तो भित्रा आणि कमकुवत होता. सुरूवातीलाच आदिलशाहने त्याचे मुद्गल आणि रायचूर हे प्रांत जिंकून घेतले. ते प्रांत पुन्हा विजयनगरच्या राज्यात आलेच नाहीत. सर्व सत्ता दिवाण तिम्मा उर्फ रंगाराय याच्या हातात होती. त्याच्या तीन मुलांपैकी थोरला मुलगा रामराय याने सत्ता हातात घेण्याचा प्रयत्न केला.

अच्युतराय नंतर त्याचा पुतण्या सदाशिवराय यास गादीवर बसवून रामराय, तिरूमल आणि व्यंकटाद्रि या रंगारायाच्या मुलांनी सत्ता आपल्या हाती घेतली.

(३) तालीकोटची लढाई (१५६५) :- रामरायाने आपल्या हाती सत्ता घेतल्यानंतर त्याने आपली फौज घेऊन राज्यास बळकटी आणली. आदिलशाही आणि कुतुबशाही ही राज्ये विजयनगरच्या सरहद्दीवर असल्याने त्यावर आक्रमणे सुरू झाली होती. तेव्हा रामरायाने सन १५४३ अहमदनगर आणि गोवळकोंड्याला संघ उभारला पण विजापूरच्या वजिरामुळे तो पुरा होऊ शकला नाही. पुढे १५५८ मध्ये अहमदनगर विरुद्ध संघ उभारण्याचा प्रयत्न केला. शेवटी रामरायाच्या उपद्रवास कंटाळून आदिलशाह आणि त्याचा वजीर किश्वर खानाने सर्व अमीर उमरावांना रामरायाविरुद्ध एकत्र जमविले.

विजयनगरचे राज्य मोठे असल्याने त्या राज्याचा नाश एकट्याकडून होणे शक्य नाही. हे लक्षात घेऊन विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा आणि बिदर या या शाह्या एकत्र आल्या. वऱ्हाड मात्र तटस्थ राहिला. त्यांनी रामरायांकडे काही प्रांत व किल्ल्यांची मागणी केली. ती रामरायाने नाकारल्यावर या चारही शाह्यांच्या फौजा त्याच्यावर चालून गेल्या.

कृष्णा नदीच्या काठावरील तालिकोट येथे दोन्ही सैन्य जय्यत तयारीने जमाले. एवढ्या मोठ्या संख्येने फौजा यावेळी प्रथमच एकत्र आल्या होत्या. सुरुवातीला रामरायाची सरशी होऊ लागली पण रामराया त्यात ठार झाल्यानंतर त्याचे सैन्य पळत सुटले. कृष्णा नदीच्या उतारावर रक्षसगी व तंगडगी या दोन गावां जवळ ही लढाई झाली म्हणून त्या लढाईस <u>राक्षसतागडीची</u> लढाई असे म्हटले आहे.

* तालिकोटच्या लढाईचे परिणाम :- तालिकोटच्या घनघोर लढाईचे भयंकर परिणाम दिसून आले या लढाईने विजयनगरचे राज्य संपूर्णपणे संपुष्टात झाले यानंतर पुन्हा लवकर हिंदूचे राज्य स्थापन होऊ शकले नाही. सन १५७० मध्ये रामरायाच्या भावाने तिरुमलने सत्ता हाती घेऊन अरविंदू (अरबिंदू) घराण्याची सत्ता स्थापन केली; पण ती फार काळ टिकली नाही. या लढाईचे बहामनी राज्यावरही मोठे परिणाम झाले

दक्षिणेतील मुस्लिम राजवटीला मोठा धक्का बसला. जोपर्यंत विजयनगर राज्यापासून त्यांना धोका होता, तोपर्यंत ते सावध होते. नंतर मात्र त्यांच्यातच संघर्ष वाढीस लागले. त्याला मोगल सत्तेला राज्यविस्तारासाठी फायदा मिळाला. या लढाईने विजयनगरच्या साम्राज्याला शेवट झाला.

(ब) बहामनी साम्राज्याचा उदय-विस्तार-महमूद गवानचे योगदान :-

महंमद तुघलकाच्या लहरी धोरणामुळे त्याच्या कारकीर्दीतच राज्यात प्रांताधिकाऱ्यांनी बंडाळ्या सुरू केल्या होत्या. बंडाळ्यांचा बंदोबस्त करणे केंद्रीय सत्तेस कठीण झाले. दौलताबादचा सुभेदार कुतलुगखान यांनी त्याच्या सहकाऱ्यासह सुलतानाविरोधी बंड केले. दक्षिणेतील मुसलमान सरदारांच्या बंडाला दौलताबाद व खान्देशाच्या सैन्यांनी सुद्धा सहकार्य केले. दौलताबादवर ताबा मिळताच बंडवाल्यांनी इस्माईल खाँ या पठाण सरदाराला आपला राजा बनविले. त्याने स्वेच्छेने आपले सर्व अधिकार हसन जाफर गंगू यास दिले हाच दक्षिणेतील बहामनी राज्याचा संस्थापक मानला जातो.

(*) अल्लाउद्दीन हसन बहामनी (इ.स. १३४७ ते १३५८) :-

अल्लाउद्दीन हसन बहमनी ऊर्फ जाफर खाँ यानी दौलताबाद या ठिकाणी स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्याचे राज्य बहमनी राज्य या नावाने ओळखले जाऊ लागले. त्याने १३ ऑगस्ट १३४७ पासून स्वतःला अबुल मुजफर अल्लाउद्दीन बहमनशाह असा किताब घेऊन राज्यकारभार

करण्यास सुरुवात केली नंतरच्या काळात गुलबर्गा ही राज्याची राजधानी करण्यात आली. बहमनी वंशाच्या उत्पत्ती संबंधात विद्वानात एकमत नाही. फेरिस्ताच्या मते, "हसन हे दिल्ली येथे ब्राह्मण गंगूकडे नोकर होते. हा ब्राह्मण महंमद तुघलकाच्या विश्वासपात्र होता. आपल्या मालकाच्या शेतात नांगरीत असताना हसन यांना एक सोन्याच्या नाण्यांनी भरलेला तांब्याचा हंडा सापडला. तो हंडा त्यांनी आपल्या मालकास प्रामाणिकपणे देऊन टाकला. त्यामुळे खुश होऊन गंगूने हसनला नोकरीच्या बंधनातून मुक्त केले. ~~त्यामुळे खुश होऊन गंगूने~~ आणि महंमद तुघलकांजवळ त्यांच्या प्रामाणिकपणाची प्रशंसा केली.

सुलतानांनेही प्रसन्न होऊन हसन यास शंभर घोडे स्वारांचा सरदार बनविले. हसन भविष्यात राज्यकर्ता होईल असे भविष्य गंगू याने वर्तविले होते. नसेल ते भाकित खरे ठरल्यास त्याला मंत्री उच्छा ही गंगू याने व्यक्त केली. त्याचे भविष्य खरे ठरले व हसन दक्षिणेत स्वतंत्र राज्यकर्ता बनला त्याने गंगू यास आपले पंतप्रधान केले. ब्राह्मण या नावावरून त्याच्या राज्यास बहामनी या नावाने ओळखले जाऊ लागले."

काही इतिहासकारांच्या मते (बुऱ्हान-ए-मासीर-या ग्रंथाच्या आधारे) हसन या इराणचा सरदार व इस्फंदियारच्या पुत्र बहमन याच्या वंशज किंवा नातेवाईक असावे. त्यामुळेच त्याने बहामनशहा हा किताब स्वतःला लावून घेतला.

अल्लाउद्दीन हसन याने आपल्या शक्तीच्या जोरावर साम्राज्य विस्तार केला. बिदर, मालखेड, गोवा, दाभोळ, कोल्हापूर, तेलंगण व कंधार हे प्रदेश जिंकले. सत्तेवर येताच त्याने हिंदूंचे प्रदेश लुटण्याचा आदेश दिला. वैनगंगा नदीपासून कृष्णानदीपर्यंत व दौलताबाद पासून पूर्वेला भोंगीरपर्यंत या राज्याचा विस्तार केला होता. अल्लाउद्दीन हसन याने राज्याचे प्रांतात (तरफ) विभाजन करून त्याने शासन करण्यासाठी मुसलमान अमिरांची नियुक्ती केली. सुभेदारांना काही अधिकार दिले होते. दौलताबाद, वऱ्हाड, बिदर व गुलबर्गा हे राज्यातील प्रांत होते. तो दयाळू, न्यायी व प्रजाहितदक्ष सुलतान होता. तसेच तो हिंदूद्वेष्टी होता. असे दिसते. त्याचा मृत्यू ११ फेब्रु १३५८ रोजी झाला.

(*) मुहम्मदशाह पहिला (इ.स. १३५८ - १३७३) - अल्लाउद्दीन हसन नंतर मुहम्मदशाह पहिला बहामनी राज्याचा सत्ताधिश बनला. त्याने राज्यकारभारापेक्षा धर्माच्या विकासासाठी साम्राज्यविस्ताराचे धोरण स्विकारले. त्याचे विजयनगर व तेलंगणाशी युद्ध झाले त्यात या दोन्ही राज्यांचा त्याने पराभव केला. त्याने विजयनगरच्या बुक्काचा पराभव केला. या स्वारीत अनेक हिंदूंची कत्तल केली. प्रो. शेरवानीच्या मते, "बहमनी राज्याच्या इतिहासातील मुहम्मदशाह हा थोर राज्यकर्ता होता".

(*) मुजाहिदशाह (इ.स. १३७३ ते १३७८) :- मुहम्मदशाह नंतर त्याचा पुत्र मुजाहिदशाह बहामनीचा सुलतान बनला. त्याचेही (P.T.O)

→(*) रिमथच्या मते हसन हा धर्मांध मुसलमान होते. त्यामुळे एका कार्यकाळाच्या स्थापित्वार्थ आपल्या राज्यास त्याचे नाव देईल असे शक्य वाटत नाही.

Date 03 06 2020

परंपरेनुसार विजयनगरशी संघर्ष सुरुच ठेवला या वेळी रायचूर दोआबाच्या प्रदेशावरून संघर्ष निर्माण होऊन मुजाहिदशहाने विजयनगरवर हल्ला केला परंतु या स्वारीत त्याला पराभव झाल्यामुळे त्याची लोकप्रियता घटली. दाऊदखान याने त्याला वध करून सत्ता ताब्यात घेतली.

⊛ मुहम्मदशाह दुसरा (इ.स १३७८ ते १३९७) :

दाऊदखानाला ही अल्पावधीत खून झाल्यामुळे बहमनशहा चा नातू मुहम्मदशाह १३७८ मध्ये गादीवर आला. त्याने युद्धाला अंगिकार केला नसल्यामुळे त्याच्या काळात शांतता नांदत होती तो विद्वानांचा चाहता होता त्याने साहित्य कला, व शास्त्रास उत्तेजन दिले.

एकंदरीत बहामनीच्या होऊन गेलेल्या राजांमध्ये मुहम्मदशाह दुसरा ~~हा~~ एक उत्तम राजा होऊन गेला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

⊛ त्यानंतर फिरोजशाह (इ.स १३९७ ते १४२२), अहमदशाह (इ.स १४२२ ते १४३५), अल्लाउद्दीन दुसरा (१४३५-१४५७), ~~हुमायुन~~ हे राज्यकर्ते सत्तेवर आले त्यानंतर मात्र हुमायुन (१४५७-१४६१) निजामशाह १४६१ ते १४६३), मुहम्मदशाह तिसरा (१४६३ ते १४८२) ~~अ~~ हे राज्यकर्ते बहामनी राज्यावर राज्यकारभार करीत होते त्यांना महमुद गवान हा कर्तबगार वजीर लाभला.

कर्तबगार वजीर त्याने बहामनी राज्याला विस्तार केला. त्याने गोवा जिंकून घेतला कोकण व ओरिसावर हल्ला करून अमाप संपत्ती मिळविली त्याला कारकीर्दीला सुविचारभावना.

⊛ <u>महमूद गवान (१४६३-१४८२)</u> :- बहमनी सुलतान अल्लाउद्दीन हुमायूनच्या मृत्यूनंतर हुमायून चा त्याचा मुलगा बहमनी सत्तेचा प्रमुख बनला (१४५८-१४६१). त्याच्या काळात महमूद गवानच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. भारतात १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात दक्षिण हिंदुस्थानातील एक प्रमुख सामर्थ्यशाली राज्य म्हणून बहमनी राज्याचा उत्कर्ष झाला तो महमूद गवानमुळेच. याच काळात <u>अफाकी (नवागत)</u> आणि <u>दक्षिणी (जुने लोक)</u> यांच्यातील भांडणामुळे बहमनी राज्यात अशांततेची परिस्थिती निर्माण झाली होती. महमूद गवान गादीवर येईपर्यंत अस्थिर स्थिती कायम होती.

⊛ <u>महमूद गवानचा उदय</u> :- महमूद गवानच्या पूर्वायुष्या-बद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. तथापि महमूद गवान जन्माने इराणी होता. इस १४५६ मध्ये बहमनी राज्यातील सुलतानाच्या एका लोकांच्या आंदोलनाचा बंदोबस्त करण्यासाठी त्याला एका सैन्याच्या तुकडीचे प्रमुखपद देण्यात आले होते. या निमित्ताने प्रथमच त्याच्या अस्तित्वाकडे लक्ष वेधले गेले. महमूद गवानची सुलतानाशी ओळख करून देण्यात आली आणि तेथून पुढे त्याचा प्रभाव उत्तरो-त्तर वाढत गेला.

⊛ <u>महमूद गवान सल्लागार मंडळावर</u> :- महमूद गवानचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत गेला. पुढे त्याचा प्रभाव इतका वाढला की, १४६१ मध्ये बहमनी सुलतानाचा मृत्यू झाल्यानंतर एका अल्पवयीन मुलास सुलतानाच्या गादीवर बसविण्यात त्याचा मोठा वाटा होता. त्यावेळेस

राज्यकारभार पाहण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सल्लागार मंडळाचे सदस्यत्व महमूद गवानला देण्यात आले. परंतु माळव्याच्या राजाने बहमनी राज्यावर एकापाठोपाठ एक आक्रमणे केल्यानंतर सल्लागार मंडळ बरखास्त करण्यात आले. आणि १४६३ मध्ये एका नव्या शहजाद्याला गादीवर बसविण्यात आले.

(*) **महमूद गवानची प्रधान मंत्री म्हणून कारकीर्द**

बहमनी सुलतान वयाच्या १० व्या वर्षी मरण पावल्यानंतर त्याचा भाऊ मुहम्मदशाह तिसरा-ह (इ.स. १४६३-१४८२) ~~सत्ता~~ सत्तेवर आला परंतु त्यावेळी त्याचे वय ~~आठच~~ ९ वर्षे म्हणजे तो अल्पवयीन होता. म्हणून त्याचा वजीर म्हणून महमूद गवानने राज्यकारभार हाती घेतला.

या शहजाद्याने महमूद गवानला वकील-उ-सल्तनत (प्रधान मंत्री) म्हणून नियुक्त केले आणि त्याला ख्वाजा-ए-जहाँ आणि मलिक-उत-तुज्जार या पदव्यांनी सन्मानित केले. महमूद गवान हा केवळ व्यापारी (तुज्जार) नव्हता; परंतु या पदव्या तत्पूर्वीच्या सुलतानांनी आपल्या प्रमुख सरदारांना बहाल केलेल्या होत्या.

What makes you happy?
#HappyCollegeDays

Scanned with CamScanner

Date 03 06 2020

* **बहामनी राज्याचा प्रमुख म्हणून महमूद गवान** — महमूद गवानचा राज्यकारभारावर प्रभाव सुमारे वीस वर्षे कायम राहिला. या काळात त्याने पूर्वेस व पश्चिमेसही राज्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. त्याने आपले महत्त्वपूर्ण लष्करी योगदान देताना दाभोळ आणि गोव्यासहित पश्चिम किनारपट्टीवर आपली अधिसत्ता प्रस्थापित केली. दाभोळ व गोवा ही बंदरे यातून निसटल्यामुळे विजयनगर साम्राज्याचे मोठे नुकसान झाले. दाभोळ व गोवा बहामनींच्या ताब्यात आल्यामुळे इराण, इराक यासारख्या देशांशी समुद्रमार्गे होणाऱ्या त्यांच्या व्यापारात मोठी वाढ घडून आली.

महमूद गवानने राज्याच्या उत्तरेकडील सीमा प्रदेशातही शांतता व सुव्यवस्था टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला. बहामनी राज्याच्या पूर्वेस व पश्चिमेस झालेल्या विस्तारामुळे त्याला पुन्हा एकदा विजयनगरशी संघर्ष सुरू झाला. या संघर्षात बहामनी राज्यापुढे विजयनगरचा टिकाव लागला. महमूद गवानने तुंगभद्रेचा दुआब जिंकून घेतला; आणि विजयनगरच्या राज्यात दक्षिणेला कांचीपर्यंत खोलवर मुसंडी मारली.

* **महमूद गवानच्या अंतर्गत सुधारणा** :- महमूद गवानने राज्यात अनेक अंतर्गत सुधारणा केल्या. त्यापैकी काही सुधारणांमागे सरदारांच्या वाढत्या सामर्थ्यावर नियंत्रण ठेवण्याचा उद्देश होता. उदा :- ① जुन्या प्रांताचे (तरफ) चार ऐवजी आठ उपविभाग करण्यात आले.
② प्रत्येक सरदाराचे वेतन व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या.

Date 03 05 2020

(३) प्रत्येक किल्ल्याच्या किल्लेदाराची नेमणूक थेट सुलतानामार्फत करण्यात येऊ लागली.

(४) ५०० घोडेस्वारांचे सैन्य ठेवणाऱ्या प्रत्येक सरदारास दरवर्षी १,००,००० होन दिले जात होते. हे वेतन रोख अथवा सरकारी जहागिर स्वरूपात दिले जात असे.

(५) प्रत्येक प्रांतामध्ये एक भूखंड (खालिसा) सुलतानाच्या खर्चासाठी राखून ठेवला जात होता.

(६) राज्यातील जमिनीची मोजणी करून त्यानुसार शेतकऱ्याने सरकारला द्यावयाच्या महसुलाची रक्कम निश्चित करण्यात आली होती.

(ड) – महमूद गवान हा कलाप्रेमी असल्याने त्याने विविध कलांना राजाश्रय दिला होता. बीदर या राजधानीच्या शहरात त्याने एका उत्कृष्ट मदरशाची (महाविद्यालय) निर्मिती केली. ही सुंदर तीन मजली इमारत रंगीत फरश्यांनी सुशोभित केलेली होती. आणि त्यात एक हजार विद्यार्थी व शिक्षकांची सोय करण्यात आली होती. मदरशातील विद्यार्थ्यांना कपडे व जेवण मोफत पुरविले जात होते. महमूदच्या गवानच्या निमंत्रणावरून त्याकाळातील इराण व इराकमधील काही थोर विद्वान लोक तेथे आले होते.

Date 03 05 2020

## ⊛ महमूद गवानचा शेवट (इस १४८२) :-

सरदारांमधील भेदभाव ही बहामनी राज्याला कायम भेडसावत राहिलेली एक मोठी समस्या होती. सरदारांमध्ये जुने व नवागत-नवागत (दक्षिणी व अफाकी) असे दोन तट पडले होते. महमूद गवान नवागत असल्यामुळे त्याला दक्षिणींचा विश्वास संपादन करावयास फार कष्ट पडले. त्याने सामोपचाराचे व्यापक धोरण स्वीकारले होते. तरीही कुरकुरी थांबत नव्हत्या. त्याच्या विरोधकांनी त्याच्या विरुद्ध लढून सुलतानाचे कान फुंकले आणि त्यामुळे सुलतानाने त्याला इसवी १४८२ सालची मध्ये मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावली. यावेळी महमूद गवानचे वय ७० वर्षांहूनही अधिक होते.

महमूद गवानच्या अंतानंतर सरदारांच्या दोन गटांमधील वैमनस्य विकोपाला गेले. वेगवेगळे प्रांतिक सुभेदार स्वतंत्र झाले आणि लवकरच बहामनी राज्याचे गोवळकोंडा, विजापूर, अहमदनगर, वऱ्हाड आणि बिदर अशा पाच शाह्यांमध्ये बहामनी साम्राज्याचे विभाजन झाले.

## ⊛ बहामनी साम्राज्याचा शेवट :-

इस १४८२ मध्ये मुहम्मदशाह तिसरा मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा महमूदशाह सत्तेवर आला तो दुबळा व चैनी असल्याने विविध ठिकाणच्या सरदार व सुभेदारांनी स्वातंत्र्य पुकारले. त्यामधूनच विजापूरची आदिलशाही (युसूफ आदिलशाह), गोवळकोंड्याची कुतुबशाही (कुतुबउल्मुल्क) वऱ्हाडची इमादशाही (इमादउल्मुल्क) अहमदनगरची निजामशाही आणि बिदरची

03 06 2020

बरीद शाही (कासिम बरीद) ही पाच राज्य उदयास आली. अशारीतीने दक्षिणेतील बहामनी राज्याचा शेवट झाला.

बहामनी राज्याने उत्तर व दक्षिण हिंदुस्थान दरम्यान एक प्रकारच्या सांस्कृतिक सेतूचे कार्य केले. बहामनी सुलतानांनी इराण व तुर्कस्थानसारख्या महत्त्वाच्या पश्चिम आशियाई देशांशीही घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले होते. या संबंधाच्या फलस्वरूप एका नव्या संस्कृतीची निर्मिती झाली. त्या संस्कृतीची उत्तर हिंदुस्थानमधील संस्कृतीपेक्षा स्वतःची अशी निराळी वैशिष्ट्ये होती. या सांस्कृतिक परंपरा पुढील काळातही राज्यांनी जतन केल्या व त्यांचा वारसा पुढे चालविला. या सांस्कृतिक परंपरांचा तत्कालीन मुघल संस्कृतीवरही प्रभाव पडला होता.

Date 04 08 2020

## (*) (क) बहामनी साम्राज्याचे विभाजन :-

* पार्श्वभूमी :- कली मुल्ला शहा हे बहामनी राज्याचे शेवटच्या सुलतान होता. त्याने आपली लुप्त झालेली प्रतिष्ठा व शक्ती पुन्हा निर्माण करण्यासाठी मोघल सम्राट बाबरला सहकार्य करण्याची विनंती केली. परंतु बाबरने त्याच्याकडे विनंतीकडे दुर्लक्ष केले. कली मुल्ला शहांच्या मृत्यूनंतर (इ.स १५२७) बहामनी राज्याचा शेवट झाला आणि त्यामधून दक्षिणेत पाच मुस्लिम राज्यांचा (शाह्या) जन्म झाला. त्या शाह्यांचा इतिहास पुढील प्रमाणे -

## (*) दक्षिणेतील पाच (शाह्या) मुस्लिम राज्ये :-

(१) **वऱ्हाडची इमादशाही** :- फतहुल्ला इमादशाह यांनी वऱ्हाड याठिकाणी एकूण ९० वर्ष राज्य केले. इ.स १४८४ मध्ये इमादशाहने फतहुल्ला याने वऱ्हाड येथे इमादशाही ची स्थापना केली. एकूण ९० वर्ष राज्य केल्यानंतर इ.स १५७४ मध्ये इमादशाहीचा शेवट झाला. फतहुल्ला इमादशाह हे मूळ हिंदू धर्मीय होता. त्याने या धर्माचा त्याग करून मुसलमान बनला होता. रज्जाना जहाँ याच्या सेवेत राहूनच त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाची जडण घडण केली. त्यामुळे तो स्वतंत्र राज्य स्थापन करू शकला. बहामनी राज्यात बहामनी सुलतानांविरुद्ध विद्रोह केलेल्या अमीरांमध्ये सर्वप्रथम इमादशाहांनी सुलतानाच्या विरोधात विद्रोह करून वऱ्हाडमध्ये आपली स्वतंत्रता घोषित केली. नंतर अहमदनगरच्या निजामशाहीने वऱ्हाडची इमादशाही जिंकून घेतली. अशा रीतीने इमादशाही चा अंत (शेवट / ऱ्हास) झाला.

Scanned with CamScanner

(२६४)

04 08 2020

# * (२) अहमदनगरची निजामशाही :-

बहामनी राज्याच्या दक्षिणी अमीरांचा नेता निजामुलमुल्क बहरी यांनी अहमदनगरच्या निजाम-शाही वंशाची राज्याची स्थापना केली. निजामुलमुल्क बहरी याला तृतीय मुहम्मदशाह या सुलतानाच्या काळात अधिक प्रभाव होता. आणि महमूद गवान याच्या ~~मृत्यूनंतर त्याच्या~~ मृत्यूमध्ये या अमीराचा-ही हात होता. सुलतानांनंतर तोच राज्याचा सर्वेसर्वा बनला होता. निजामुलमुल्क बहरी याचा पुत्र मालिक अहमद बहरी या तिसऱ्या मुहम्मदशाह याच्या कारकिर्दीत जुन्नर (कुमेर) येथील प्रांताध्यक्ष होता. त्याने अहमदनगर या ठिकाणी निजामशाहीचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचे श्रेय होते. बहामनी राज्याच्या अन्य विद्रोही अमीरांप्रमाणेच मलीक अहमद बहरी यांनीही मुहम्मदशाहांच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात मुहम्मदशाहांच्या विरोधात बंड पुकारले आणि आपल्या पित्याच्या हत्येचा बदला घेण्यासाठी नवनिर्मित अहमदनगर या ठिकाणी स्वातंत्र्याची घोषणा केली. तसेच त्यांनी आपल्या नावाचा खुतबा वाचला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मालिक अहमद बहरीने दौलताबाद आणि त्याच्या आश्रित असलेल्या प्रदेशावर ताबा मिळविण्यासाठी सतत युध्दे केली. इ.स. १४९९ साली या सर्व प्रदेश त्यांच्या ताब्यात आला. इ.स. १५०८ साली अहमद बहरी निजामशाह मेला.

Date 08 06 2020

मृत्यू झाल्यानंतर त्याचा पुत्र बुरहान निजामशाह अहमदनगर च्या शासक बनला. गादीवर आला तेव्हा तो अल्पवयीन असल्याने त्याच्या पित्याच्या काळातील बृहद पदाधिकारी राज्यकारभार पाहू लागले. फरिश्ताने या सुलतानाची फार स्तुती केली आहे तो म्हणतो, बुरहान निजामशाह हा विद्याप्रेमी होता आणि त्याने दहावर्षाच्या आयुष्यात शासकाच्या कर्तव्यासंबंधीत एक पुस्तक लिहिले. प्रौढ झाल्यावर त्यांनी शेजारी राज्यांशी युद्ध करण्यात अधिक काळ घालविला. आपली सत्ता सदृढ करण्यासाठी त्यांनी विजापूरच्या राजकुमारी बरोबर विवाह केला. आणि तेथील शासका-च्या लष्करी सहकार्याने गुजराथ, खानदेश आणि वऱ्हाडच्या संयुक्त आक्रमणास तोंड दिले. ही घटना इ.स १५२४ मधील आहे. परंतु त्याचे विजापूरच्या शासकाबरोबर अधिक काळ मैत्रीसंबंध राहू शकले नाहीत. त्यामुळे त्याने विजापूरशी युद्ध केले आणि त्यासाठी त्यांनी विजयनगरच्या राज्यांशी मैत्री केली. विजयनगर आणि अहमदनगरच्या संयुक्त सैन्यांनी विजापूरवर हल्ला करून आदिलशाहीचा पराभव केला. यानंतर बुरहानशाह यांनी सोलापूरचा किल्ला जिंकला आणि आदिलशाही करार केला. परंतु इ.स १५३३ साली विजापूरला राज्यात निर्माण झालेल्या अशांततेचा फायदा घेऊन बुरहानशाह यांनी विजापूरला वेढा दिला. पण त्यास काहीच अवधितच वेढा उठवावा लागला आणि थोड्या अवधीतच त्यासाठी

 

त्याचाही देहांत झाला. बुरहानशाह नंतर सत्तेवर आलेले शासक अयोग्य होते. सर्वप्रथम हुसेनशाह सत्ताधिश झाला. यांच्या कारकीर्दीत विजयनगर राज्याशी युद्ध झाले. अली आदिलशहांनी विजयनगर विरुद्ध बनविलेल्या संघात भाग घेतला होता. इ.स १५६५ मध्ये हुसेनशाह मृत्यू पावल्यानंतर मुर्तजा निजामशाह गादीवर आले. परंतु त्यांनी लगेच सिंहासनाचा त्याग करून आपले मंत्री साहिब खाँ आणि सलावत खाँ यांच्याकडे राज्य सोपविले. यानंतर अहमदनगरच्या इतिहास महत्व-हीन आहे. केवळ राजकुमार मुराद यांचे आक्रमण विशेष उल्लेखनीय घटना आहे. चाँदबीबी यांनी मोठ्या धाडसाने मोगल सैन्यांशी लढा दिला. परंतु मोगलांनी किल्ला शरण येण्यास भाग पाडले. यानंतर झालेल्या कराराने चाँदबीबी यांनी वऱ्हाड्चा प्रदेश मोगलांना देऊन टाकला. परंतु काही काळानंतर मोगलांनी पुन्हा अहमद अहमदनगर आक्रमण केले. विद्रोही अमीरांनी चाँदबीबी यांची हत्या केली आणि इ.स १६०० साली मोगल सैन्यांनी अहमदनगर जिंकून घेतले. अशा रीतीने मोगलांच्या आक्रमणा-पासून अहमदनगरच्या निजामशाहीचा अंत झाला. (-घरत)

(३) विजापूरची आदिलशाही :- इ.स १४८९ साली युसूफ आदिलशाह यांनी विजापूर या ठिकाणी आदिलशाही वंशाच्या राज्याची स्थापना केली. त्यांचा जन्म जॉर्जिया मध्ये झाला असून ते दासच्या रुपाने भारतात आले होते. भारतातील विदेशी अमीरांचे नेते महमूद गवान याने त्याला खरेदी केले आणि त्याला आपला दत्तक पुत्र बनविले. युसूफ आदिलशहांच्या व्यक्तीमत्वामुळे प्रभावित होऊन बहामनी सुलतान मुहम्मदशाहनी त्यांना आपल्या अमीर लोकात समाविष्ट करून घेतले आणि काही काळातच महमूद गवान यांच्या प्रभाव व आश्रया-मुळे तो राज्याचा शक्तिशाली अमीर बनला.

फरिश्तांच्या मते, "तो राजघराण्यात जन्माला आला होता. आणि तो सुलतान मुहम्मद द्वितीयचा पुत्र होता. सुलतान मुहम्मद यांच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र मुहम्मदने आपली सत्ता सुदृढ करण्यासाठी राजपरिवाराच्या सर्व पुरुषांना मारण्याची आज्ञा केली होती. त्यामुळे सुरक्षिततेसाठी तो भारतात आला." महमूद गवान च्या कृपेने त्यांनी आपला विकास केला. पुढे बहामनी सुलतान मुहम्मदशहाच्या हत्येनंतर त्यांनी आपली स्वतंत्रता घोषित केली.

विजापूरचे आदिलशाही राज्य शक्तिशाली होते. इतर शाहीसत्ता आदिलशाहीला वचकून रहात होत्या. बरीदशाहीचे संस्थापक कासिम बरीद यांनी विजयनगरचे राजा नरसिंह यांच्यासह विजापूर हल्ला-केला.

Scanned with CamScanner

परंतु युसूफ आदिलशाहने नरसिंहचा पराभव केला. परिणामी आदिलशाहीची प्रतिष्ठा वाढली. इ.स १४९५ मध्ये गुलबर्ग्याचा प्रांताध्यक्ष दस्तूर दीनार यांनी युसूफ आदिलशाह विरोधी विद्रोह केला. आदिलशाहनी त्याला पराभूत करून कैद केले. यानंतर आदिलशाहनी गुलबर्गा जिंकण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बरीदशाही व आदिलशाही राज्यात युद्धास प्रारंभ झाला. पण आदिलशाहनी कासिम बरिद याचा पराभव केला व गुलबर्गा जिंकून घेतले. दस्तूर दीनार यांनी कासिम बरीद यास मारण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा युसूफ आदिलशाहनी त्याला संरक्षण देऊन त्याला पुन्हा गुलबर्ग्याला प्रांताध्यक्ष केले. त्यातील काही हब्शी लोकांच्या सरदाराने युसूफ आदिलशाहला सामना करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो पराभूत होऊन ठार झाला.

या विजयानंतर युसूफ आदिलशाहनी आपल्या राज्यातील अंतर्गत प्रशासनाकडे आपले लक्ष केंद्रीत केले. परंतु या क्षेत्रात त्याला भरीव स्वरूपाचे कार्य करता आले नाही. युसूफ यांनी राज्य प्राप्तीनंतर शिया धर्मास राजधर्म बनविण्याची शपथ घेतली होती. त्यानुसार त्यांनी इ.स १५०२ साली शिया संप्रदायास राजधर्म म्हणून घोषीत केले. युसूफ धर्मवेडे नव्हता.

तर तो धर्मसहिष्णु वृत्तीचा होता त्यांनी मुकुंदराज नावाच्या एका मराठा सरदाराच्या कन्येशी विवाह केला होता. तिच्या प्रभावामुळे ते धर्मसहिष्णु बनलेले होते. त्यांनी कोणावरही विशिष्ट धर्म स्वीकारण्याला आग्रह धरला नाही. या बाबतीत त्यांनी लोकांना स्वातंत्र्य दिले होते. असे असतांनाही दक्षिणेतील अन्य राज्यांनी युसूफ यांना विरोध करून त्यांच्यावर संयुक्तपणे आक्रमण करण्यासाठी हालचाल सुरू केली. या सर्व कारवाई सूत्रधार बिदरचे शासक कासिम बरीद हा होता.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून युसूफ वऱ्हाडच्या शासक इमादशाहकडे गेला व त्याला शरण आला. तसेच त्यांनी इमादशाहच्या सल्ल्यानुसार सुन्नी संप्रदायास राजधर्म म्हणून घोषित केले आणि खान्देशाचा दौरा सुद्धा केला. दरम्यान इमादुल्मुल्क यांनी आपल्या मित्र राज्यांना - सांगितले की, कासिम बरीद हा आपल्या स्वार्थासाठी युसूफ आदिलशाहच्या शक्तीचा उपयोग करीत होता परिणामी अहमदनगर आणि गोवळकोंड्याच्या सुलतानांनी संधान आपले अंग बाहेर काढून घेतले त्यामुळे कासिम बरीद एकटाच पडला. याला फायदा युसूफ आदिलशाहाने घेऊन त्याने कासिम बरिदचा पराभव केला व तो विजापूरला परत आला.

इ. स १५१० साली पोर्तुगालने विजापूरच्या राज्यातील गोवा जिंकून घेतला. त्यामुळे युसूफ आदिलशहाने पोर्तुगालला पराभव केला. परंतु थोड्या काळानंतर युसूफ याला मृत्यु झाला आणि पोर्तुगालने गोवा पुन्हा जिंकून

(१०५)

Date ०४ ०६ २०२०

~~ओलावा~~ - जिंकून घेतला. युसूफ आदिलशाहच्या मृत्यूनंतर नऊ वर्षांचा इस्माईल आदिलशाह इ.स. १५१० मध्ये गादीवर आला त्याचा सरदार कमाल खाँ होता. त्यांनी अमीर बरीदच्या सहकार्याने सिंहासन बळकावण्याचा प्रयत्न केला. परंतु राजमातेच्या सतर्कतेमुळे कमाल खाँ याचा वध करण्यात आला. यानंतर इस्माईल स्वतंत्रपणे राज्य करू लागले. त्यांनी विजयनगर राज्याशी लढून रायचूर आणि रोआबचा प्रदेश जिंकून घेतला. इ.स. १५३४ मध्ये इस्माईल याचा मृत्यू झाला. यानंतर मल्लू आदिलशाह सुलतान झाला. परंतु त्याला पदच्युत करून अंधळे करण्यात आले आणि इब्राहीम आदिलशाह गादीवर बसला. या प्रथम इब्राहीम आदिलशहानी सुन्नी संप्रदायास राजधर्म म्हणून घोषित केले. त्यांनी आपल्या सेवेतील सर्व परकीयांना काढून टाकले. त्या परकीयांना विजयनगरच्या राजा रामराज यांनी आपल्या दरबारात सेवेत घेतले. नेमके याच वेळी राज्यात अराजकता निर्माण झाली. परमालराव ~~[illegible]~~ने रामराजाला गादीवरून हटवून सत्ता स्वतः ~~बळकावली~~ बळकावली. परमालकडून धन प्राप्त करण्यासाठी इब्राहीमने त्यास लष्करी मदत केली. तरीही रामराजा सिंहासन परत मिळविण्यात यशस्वी झाला.

# HappyCollegeDays

(१५३) Date 04 05 2020

इब्राहिम आदिलशहाने अहमदनगर, बिदर व गोवळ-कोंडा राज्यांशी यशस्वीपणे युद्धे केली. आपल्या शत्रूपासून राज्याचे संरक्षण केल्यानंतर इब्राहीम विलास जीवन जगू लागला. त्यामुळे त्याला रोग होऊन तो इ.स. १५५८ साली मरण पावला. इब्राहीमच्या कारकिर्दीतील विजयनगरच्या राज्याचे महत्त्व वाढले होते. इब्राहीमनंतर अली आदिल-शहा या गादीवर आला (सिंहासनाधीन आला) त्याने पुन्हा शिया संप्रदायास राजाश्रय देऊन त्यास राजधर्म म्हणून घोषित केले. त्यामुळे राज्यात असंतोष पसरला होता. इ.स. १५५८ साली त्याने विजयनगरच्या रामराजाशी मैत्री करून अहमदनगरवर आक्रमण केले. परंतु नरसंहार शिवाय ते काही करू शकले नाही. या युद्धात हिंदु व मुसलमान लोकांचे मोठ्या प्रमाणात खून करण्यात आले ले पाहून खुद्द अली आदिलशहा विजयनगरची शक्ती पाहून घाबरून गेला. यानंतर तो विजयनगरच्या धर्म युद्ध पुकारण्याचा विचार करू लागला. त्याच्या नेतृत्वा मुळेच दक्षिणेतील चार मुसलमान राज्य आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही आणि बरिदशाही यांचा एक संघ तयार झाला. या संघाच्या संयुक्त सैन्यांनी इ.स. १५६५ साली विजयनगरवर हल्ला केला. यांच्या आलेल्या तालिकोटच्या (राक्षस तागडीची लढाई) लढाईत शाही फौजांनी विजयनगरचा पराभव केला. व विजयनगर राज्याला शेवट आला. इ.स. १५८० साली अली आदिलशहाचा वध त्यांच्या रखेलीने केला.

(PTO)

 Date ०४ ०८ २०२०

त्यानंतर इ.स.१५८० साली द्वितीय इब्राहीम आदिलशाह गादीवर आला तो अल्पवयीन असल्याने त्याची मामी (आई) चांदबीबी राज्यकारभार पाहू लागली. ती आपल्या वीरतेसाठी इतिहासात प्रसिद्ध आहे. अहमदनगरच्या सुलतान इ.स १५९४ मध्ये युद्धात ठार झाला. व इब्राहीम विजयी झाला त्याचा मृत्यु इ.स. १६२६ साली झाला. मोगल सम्राट औरंगजेब यानी इ.स १६८० साली आदिलशाहीचे राज्य जिंकून घेतले.

---

## ④ गोवळकोंड्याची कुतुबशाही :-

कुतुबउलमुल्क यानी गोवळकोंडा याठिकाणी कुतुबशाही वंशाची स्थापना इ.स १५१८ साली. कुत्बशाहीला तो महमूदशाह बहामनीच्या कारकीर्दीत एका विभागाचे अध्यक्ष होता. पुढे तो प्रांताधिकारी बनला. त्यानी प्रामाणिक-पणे आपल्या स्वामीची सेवा केली. परंतु गादीवर कासिम बरीद त्याचे काहीच चालू देईना म्हणून त्यानी इ.स १५१८ साली आपले स्वातंत्र्य घोषित केले. अशा प्रकारे या नव्या मुस्लीम राज्याने वरंगळच्या प्राचीन काकतीय वंशाचे स्थान (स्थान) ग्रहण केले. कुतुबउलमुल्क यानी ५० वर्ष राज्य केले.

Date ०८ ०६ २०२०

त्याचा पुत्र जमसेद यानी ~~त्याची~~ त्याचा वध केला. यानंतर कुतुबशाही वंशात अनेक राजे होऊन गेले. परंतु ते शक्तीहीन व अयोग्य असल्याने त्यांना इतिहासात फारसे स्थान नाही. इ.स. १६११ पर्यंत कुतुबशाहीचे राज्य स्वतंत्र होते. पुढे इ.स १६८७ साली मोगल सम्राट औरंगजेब यानी कुतुबशाहीचे राज्य जिंकून घेतले.

(५) बिदरची बरीदशाही :- बहामनी राज्याचा अंतिम शासक कलिमउल्लाच्या ताब्यातून विजापुर निसटल्यानंतर इ.स १५२८ साली कासिम बरीद यानी सुलतान ही पदवी धारण केली आणि बिदर या ठिकाणी स्वतंत्र राज्याची स्थापना केली. इ.स १६०९ पर्यंत बरीदशाहीचे राज्य जिवंत होते. पुढे त्याच वर्षी आदिलशाहीने हे राज्य जिंकून घेतले.